ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख ६ डिसेंबर, १९५० | अंक ४६

स्थापना १९१६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

पॅलेस स्ट्रीट, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.
ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षं | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## महाराष्ट्र सहकारी विद्यालय

पुणें १

या विद्यालयाचे वर्ग ता. २ जानेवारी १९५१ पासून नं. ५ बैरामजी जिजिभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को. ऑफिसर, खरेदी विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठी विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ डिसेंबर १९५० च्या आंत अर्ज करावे.

बा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१८,२६५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७१,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. म. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—मालाचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स मशीन टूल्स

कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.

या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.

केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.


# विविध माहिती

**तांबडा जोंधळा स्वस्त मिळणार**— भारतांत दुष्काळ पडण्याची भीति झाल्यामुळें अमेरिकेनें सुमारें ८,००,००० ते ९,००,००० टन लाल जोंधळा विकत देण्याची तयारी दर्शविली आहे. ह्या जोंधळयाचा भाव बाजारभावापेक्षां बराच कमी लावण्यांत येणार आहे असें समजतें.

**गिरण्यांसाठी अमेरिकन कापूस**—भारतांतील कापडाच्या गिरण्यांना सध्यां कापसाचा तुटवडा भासत आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन अमेरिकेनें १ लाख, ३६ हजार गाठी कापूस कर्जाऊ म्हणून देण्याचें कबूल केलें आहे, अशी वार्ता आहे.

**सीलोनमध्यें कापडाची गिरणी**—सीलोनमध्यें सरकारी मालकीची गिरणी काढण्याच्या योजनेसंबंधीं सध्यां विचार चालू आहे. ही गिरणी काढण्यासाठी १७० लाख रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज आहे. सीलोनला दरवर्षी १० कोटी वार कापड लागतें. त्यापैकीं १·४५ कोटी वार कापड ह्या गिरणींत तयार होईल. गिरणींत २५,००० चात्या व आणि ५०० माग बसविण्यांत येणार आहेत.

**नेपा मिल्सची मालकी**—मध्य प्रांतांतील नेपा मिल्स हा सरकारी कागदाचा कारखाना बिर्ला शेटजींनीं विकत घेतला आहे असें समजतें. ह्या कारखान्यासाठी सरकारनें १५० लाखांचें भांडवल भागांच्या विक्रीनें उभें केलें होतें. हें भांडवल आतां कारखान्याला दिलेलें कर्ज म्हणून मानण्यांत येणार आहे. कारखाना उभारण्यासाठीं लागणारे आणखी तीन कोटी रु. बिर्लाशेट स्वतःच घालणार आहेत.

**पाकिस्तान टी बोर्ड**—पाकिस्तानच्या सरकारनें वरील नांवाची एक संघटना स्थापन केली आहे. पाकिस्तानांत निर्माण होणाऱ्या चहाची देशांत आणि परदेशांत होणारी विक्री अधिक वाढविण्याचें कार्य सदर संघटना करणार आहे.

**रशिया–इजिप्त व्यापार करार**—रशिआकडून १,००,००० टन गहूं घेऊन त्याच्या बदला कापूस देण्याच्या व्यापारी वाटाघाटी सध्यां इजिप्तचें सरकार करीत आहे. ह्यापूर्वी असेच दोन करार उभय राष्ट्रांत झालेले आहेत. रशियाकडून इजिप्तला मिळणारा गहूं येत्या डिसेंबर व जानेवारी महिन्यांत रशिअन जहाजांतूनच पाठविण्यांत येणार आहे.

**हातमागाच्या कापडावर जकात माफ**—हातकताईचें सूत आणि हातमागावर तयार झालेलें कापड ह्या मालावर नगरपालिकांनीं जकात घेऊं नये असा हुकूम मध्यभारत सरकारनें काढला आहे. घरगुती उद्योगधंद्यांना कारखान्याच्या मालाशीं बाजारांत चढाओढ करतां यावी म्हणून वरील आज्ञा जारी करण्यांत आली आहे.

**कराचींत कापडाची गिरणी**—चालू वर्षअखेर कराचींत आणखी एक कापडाची गिरणी निघणार आहे. ही गिरणी जपानच्या इंजिनिअर्सनीं उभारली असून तींत १ कोटी रुपयांचें भांडवल गुंतविण्यांत आलें आहे. गिरणींत तीन पाळ्या चालविण्यांत आल्या तर रोजीं १५,००० पौण्ड कापड निघूं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**अँग्लो–इराणियन ऑईल कंपनीच्या सवलती**—अँग्लो-इराणियन ऑईल कंपनी व इराणचें सरकार यांचे दरम्यान तेल उपसण्यासंबंधीं एक करार नुकताच झाला. ह्या कराराला अजून इराणच्या पार्लमेंटची मंजुरी मिळावयाची आहे. करारांतील कांहीं कलमें इराणच्या हितसंबंधाला बाधक आहेत असें म्हणतात.

**एका खान्याचा खर्च**:—गेल्या जून महिन्यांत पंतप्रधान पं. नेहरू सिंगापूरला गेले होते, त्यावेळीं त्यांना तेथील कायदेमंडळातर्फे खाना देण्यांत आला होता. ह्या खान्यासाठी ५,६३६ रुपये खर्च आला. हा खर्च कोणच्या खातीं खर्ची घालावयाचा ह्यासंबंधीं प्रश्न निर्माण झाल्यामुळें तो सरकारी वाहनांना होणाऱ्या अपघाताखालीं खर्ची घालण्यांत आला.

**सहकारी परिषद**—म्हैसूर प्रां. सहकारी परिषदेचें ३७ वें अधिवेशन ता. ३० डिसेंबर रोजीं म्हैसूर येथें भरणार आहे. भारतीय सरकारच्या शेतकी खात्याचे चिटणीस श्री. पंजाबी ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे. म्हैसूरच्या शेतकी खात्याचे मंत्री परिषदेचें उद्घाटन करतील.

**सीलोनमध्यें पोलादाचा कारखाना**—सीलोनला दरवर्षी लागणाऱ्या लोखंड व पोलादापैकीं ½ लोखंड व पोलाद त्याच देशांत तयार करण्यांत येणार आहे. सीलोनच्या चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत ह्या कारखान्याला लागणाऱ्या भांडवलाची तरतूद करण्यांत आली आहे. कारखाना काढण्याच्या कामीं भारताची मदत घेण्यांत येणार आहे.

**कै. भुलाभाई देसाई ह्यांचा पुतळा**—श्री. भुलाभाई देसाई ह्यांचा पुतळा तयार करण्यासाठीं कलावंतांकडून छातीपर्यंतच्या भागाचे प्लॅस्टरचे नमुने मागविण्यांत आले आहेत. ह्या नमुन्यांना प्रत्येकीं २५० रुपये सन्माननीय तनखा देण्यांत येणार आहे.

**'ट्यूब' विहिरीसाठी कर्ज**—मुंबई राज्यांत 'ट्यूब' विहिरी खोदण्यासाठी भारतीय सरकारनें दोन कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. छोट्या पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी दिलेल्या १ कोटी रु. कर्जाची रक्कम स्वतंत्र आहे. अहमदाबाद, मेहसाणा, बनासकांठा आणि साबरमती जिल्ह्यांसाठी ह्या कर्जाचा उपयोग करण्यांत येणार असल्याचें समजतें.

**उसावरील जकात**—पंजाब स्टेट शुगर केन कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं, नगरपालिकांनीं आपल्या हद्दींत येणाऱ्या उसावर जकात घेऊं नये. रसाच्या मळीवर दर मणामागें सरकार जो १२ आणे कर घेतें त्याचा उपयोग उसाच्या पिकाची वाढ करण्याकडे करण्यांत यावा अशी दुसरी एक सूचना कमिटीनें केली आहे.

**काळी नदीवर धरण**—काळी नदीवर धरण बांधून वीज उत्पन्न करण्याची योजना मुंबई सरकारनें सोडून दिली नसून उलट तिला प्राधान्य दिलें असल्याचें समजतें. मुंबई राज्यांतील पुनर्घटनेची ही एक दूरगामी योजना आहे.

**अमेरिकेचें अल्युमिनियमचें उत्पादन**—अमेरिकेनें आपलें ॲल्युमिनियमचें उत्पादन वार्षिक १,००,००० टनांनीं वाढविण्याचें ठरविलें आहे. शस्त्रास्त्रें तयार करण्याच्या कामीं हा धातू फार महत्त्वाचा असल्यानें सध्यांच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितींत त्याच्या उत्पादनाला साहजिकच महत्त्व आलें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ६ डिसेंबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दक्षिण व आग्नेय आशियाचा आर्थिक विकास

### कोलंबो योजना : स्वरूप व अपेक्षा

दक्षिण व आग्नेय आशियांत जगाच्या एकूण लोकसंख्येपैकीं एक चतुर्थांश म्हणजे ५७ कोटी लोक राहातात. त्यांच्या आर्थिक उद्धारासाठीं तयार केलेली कोलंबो योजना गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झाली आहे. जुलै १९५१ ते जून १९५७ अखेरचा कार्यक्रम तीमध्यें समाविष्ट असून योजनेवरील खर्चाचा अंदाज २०० कोटी पौंडांचा आहे. शेती, वाहतूक, वीज, उद्योगधंदे, सामाजिक सुखसोयी, इ. ची वाढ योजनेंत अंतर्भूत आहे व त्याकरितां ह्या विभागांत कच्चा माल, यंत्रसामुग्री इ. ची मोठ्या प्रमाणावर बाहेरून आयात करावी लागेल.

ब्रिटिश कॉमनवेल्थमधील देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची बैठक जानेवारी १९५० मध्यें कोलंबो येथें भरली होती. तिनें दक्षिण व आग्नेय आशियांतील प्रश्नांकडे अधिक लक्ष देणें आवश्यक आहे असें ठरविलें. त्यांतून निर्माण झालेली योजना म्हणजेच कोलंबो योजना होय. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, सिलोन, भारत, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि ग्रेट ब्रिटन ह्यांनी मिळून कोलंबो योजना तयार केली असून ह्या विभागांतील बर्मा, आयर्लंड, इंडोनेशिया, कँबोडिया, व्हिएटनाम, ह्या कॉमनवेल्थ बाहेरील देशांचेंहि योजना यशस्वी करण्याचे कामीं सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

एवढी मोठी योजना हातीं घेऊन ती पुरी करणें जितकें आवश्यक व तातडीचें आहे, तितकेंच तें दक्षिण व आग्नेय आशियांतील देशांच्या कुवतीबाहेरचें पण आहे. तेथील लोक शेतीवर अवलंबून असूनहि पुरेसें क्षेत्र अद्याप लागवडीखालीं आलेलें नाहीं व लागवडीखालील जमिनींतील उत्पादनहि समाधानकारक नाहीं. ग्रेट ब्रिटन, अमेरिका, कॅनडा, इं. मो. फंड, इं. बँक, इत्यादींच्या आर्थिक सहाय्याचा थोडा–फार उपयोग झाला असला तरी विकासाचें खरें काम अद्याप खरोखर सुरूहि झालेलें नाहीं, इतकी अल्प प्रगति दिसून येते. पश्चिम युरोपांतील पुनर्घटनेचें काम त्या मानानें सोपें होतें. आशियांत अगदी पायापासूनच प्रारंभ करावयाचा आहे. प्रदेशांचा विस्तार, त्यांतील लोकसंख्या, तेथील मागसलेपणा, इत्यादींचा विचार केला तर उद्धारासाठीं भगीरथ प्रयत्न केले तरी ते अपुरे पडण्याचा संभव आहे. एकीकडे उत्पादन घटलें असलें, तरी लोकसंख्येची वाढ अखंड चालूच आहे. आज ५७ कोटी लोकांच्या पोटाचा प्रश्न आहे, तो वीस वर्षांत ७२ कोटी लोकांच्या पोटाचा प्रश्न होणार आहे. त्यामुळें, रहाणीच्या मानांत सुधारणा करतांना अन्नपुरवठ्यास म्हणजे शेतीस प्राधान्य मिळणें अपरिहार्य आहे. एकूण खर्चापैकीं ३४% रक्कम वहातुकीच्या सुधारणेवर खर्ची पडेल, ३२% रक्कम शेतीच्या वाट्यांस येईल, १८% रक्कम घरांसाठी, आरोग्यासाठी व शिक्षणासाठी उपलब्ध होईल, १०% उद्योगधंदे व खाणी ह्यांवर खर्चण्यांत येईल आणि ६% जळण व वीज ह्यांच्या वाढीप्रीत्यर्थ गुंतविली जाईल.

प्रत्येक देशास स्वतःच्या विकासाची काळजी आहेच, आणि प्रत्येकाचे त्या दृष्टीनें प्रयत्नहि चालू आहेत. परंतु, तज्ज्ञ सल्ला व तज्ज्ञ यंत्रज्ञ ह्यांचा आणि भांडवलाचा तुटवडा ह्यांमुळें इष्ट प्रगति होऊं शकत नाहीं. कोलंबो योजनेनें ह्या अडचणींचा तपशीलवार विचार केलेला आहे. विकासासाठी भांडवली खर्चाची तरतूद करण्यासाठीं दक्षिण व आग्नेय आशियाला बाहेरील मदतीची तीव्र गरज भासेल; त्यांच्या निर्गतीचे विनिमयांत पुरेशी मदत तें मिळवूं शकणार नाहींत. ग्रेट ब्रिटनमधील स्टर्लिंगची शिल्लक भारत, पाकिस्तान व सिलोन ह्यांना उपलब्ध होईल. परदेशीय खासगी भांडवलाची आयात, लंडन व इतर ठिकाणीं कर्ज उभारणी, इत्यादि मार्गहि सुचविण्यांत आले आहेत. इं. बँकेचें कर्ज, इतर देशांच्या देणग्या, वगैरे मार्गानेंहि कांहीं मदत हातीं येण्याजोगी आहे.

कोलंबो योजनेचें स्वरूप थोडक्यांत वरीलप्रमाणें आहे. त्यांत सामील होणाऱ्या देशांना ह्या योजनेच्या यशासाठीं इतरांवर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अवलंबून रहावें लागणार आहे. आशियांतील लोकांची आर्थिक स्थिति सुधारली तर त्याचे राजकीय परिणाम युरोप–अमेरिकेच्या दृष्टीनें हितावह होतील, ह्यामुळेंच कोलंबो योजनेस जागतिक महत्त्व आहे. योजनेचें प्रचंड स्वरूप, तिच्या यशाच्या मार्गांतील अडचणी आणि ती यशस्वी झाली तरी त्यामुळें परिस्थितींत होणारी अत्यल्प सुधारणा, ह्या सर्वांचा विचार केला असतांना, विशेष आशादायक निष्पत्ति होईल, असें वाटत नाहीं.

भारताच्या षड्वार्षिक योजनेपुरता विचार करतां मंजूर केलेल्या कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणें आहे:–

| | कोटी रु. | एकूण खर्चाचें % प्रमाण |
|---|---|---|
| शेती | ६०८.० | ३३ |
| वहातुक, रेल्वे, रस्ते, बंदरे | ७०२.७ | ३८ |
| इंधन व विद्युत् | ५७.६ | ३ |
| उद्योगधंदे, खाणी | १८०.० | १० |
| सामाजिक सुखसोई | २९१.३ | १६ |
| | १८३९.६ | १०० |

वरीलप्रमाणें खर्च होऊन योजनेपासून अपेक्षित फलप्राप्ति झाली तर, प्रत्येक भारतीयास सध्यां वार्षिक १० वार कापड मिळतें, तें १५ वार मिळूं शकेल व शहरी भागांतील धान्य वाटपांतील १२ औंसाऐवजीं १६ औंसांचें रेशन होईल. परराष्ट्रीय व्यापारांत समतोलपणा निर्माण होण्याची अपेक्षा आहे. ही योजना चालू ठेवण्यासाठीं भारत सरकारला अत्यंत कडकपणें कायद्यांची अंमलबजावणी करावी लागेल, आयातींत कपात करणें भाग पडेल, चालू केलेल्या कांहीं विकास–योजना सोडून द्याव्या लागतील, खर्चांत निर्दयपणें काटकसर करणें भाग पडेल, आर्थिक नियंत्रणें आवळावीं लागतील, बेकारी वाढली तर त्याच्या राजकीय परिणामांस तोंड द्यावें लागेल; थोडक्यांत म्हणजे अत्यंत कडक रीतीनें व दक्षतेनें अर्थकारणाची अंमलबजावणी केल्याविना पुढें पाऊल पडणार नाहीं. भारत सरकार हें करूं शकलें, तरच आपल्या उद्धाराची आशा आहे.

राष्ट्रांच्या हिताविरुद्ध वर्तन करून स्वतःचा फायदा करून घेण्याचा मोह कोणत्याहि सरकारी अधिकाऱ्यास किंवा व्यापारी–कारखानदारास होऊंच नये, अशी चोख व्यवस्था झाली नाहीं, तर सामान्य जनतेवरील बोजा आणखी वाढण्यास कोलंबो योजनेमुळें वाव निर्माण होईल, एवढें मात्र निश्चित.

**दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स**
**मशीन टूल्स**
**कडवा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.**
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
**केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

# विविध माहिती

**तांबडा जोंधळा स्वस्त मिळणार**— भारतांत दुष्काळ पडण्याची भीति झाल्यामुळें अमेरिकेनें सुमारें ८,००,००० ते ९,००,००० टन लाल जोंधळा विकत देण्याची तयारी दर्शविली आहे. ह्या जोंधळयाचा भाव बाजारभावापेक्षां बराच कमी लावण्यांत येणार आहे असें समजतें.

**गिरण्यांसाठीं अमेरिकन कापूस**—भारतांतील कापडाच्या गिरण्यांना सध्यां कापसाचा तुटवडा भासत आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन अमेरिकेनें १ लाख, ३६ हजार गाठी कापूस कर्जाऊ म्हणून देण्याचें कबूल केलें आहे, अशी वार्ता आहे.

**सीलोनमध्यें कापडाची गिरणी**—सीलोनमध्यें सरकारी मालकीची गिरणी काढण्याच्या योजनेसंबंधीं सध्यां विचार चालू आहे. ही गिरणी काढण्यासाठीं १७० लाख रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज आहे. सीलोनला दरवर्षी १० कोटी वार कापड लागतें. त्यापैकीं १·४५ कोटी वार कापड ह्या गिरणींत तयार होईल. गिरणींत २५,००० चात्या व आणि ५०० माग बसविण्यांत येणार आहेत.

**नेपा मिल्सची मालकी**—मध्य प्रांतांतील नेपा मिल्स हा सरकारी कागदाचा कारखाना बिर्ला शेटजींनीं विकत घेतला आहे असें समजतें. ह्या कारखान्यासाठीं सरकारनें १५० लाखांचें भांडवल भागांच्या विक्रीनें उभें केलें होतें. हें भांडवल आतां कारखान्याला दिलेलें कर्ज म्हणून मानण्यांत येणार आहे. कारखाना उभारण्यासाठीं लागणारे आणखी तीन कोटी रु. बिर्लाशेट स्वतःच घालणार आहेत.

**पाकिस्तान टी बोर्ड**—पाकिस्तानच्या सरकारनें वरील नांवाची एक संघटना स्थापन केली आहे. पाकिस्तानांत निर्माण होणाऱ्या चहाची देशांत आणि परदेशांत होणारी विक्री अधिक वाढविण्याचें कार्य सदर संघटना करणार आहे.

**रशिया–इजिप्त व्यापार करार**—रशिआकडून १,००,००० टन गहूं घेऊन त्याच्या बदला कापूस देण्याच्या व्यापारी वाटाघाटी सध्यां इजिप्तचें सरकार करीत आहे. ह्यापूर्वी असेच दोन करार उभय राष्ट्रांत झालेले आहेत. रशियाकडून इजिप्तला मिळणारा गहूं येत्या डिसेंबर व जानेवारी महिन्यांत रशिअन जहाजांतूनच पाठविण्यांत येणार आहे.

**हातमागाच्या कापडावर जकात माफ**—हातकताईचें सूत आणि हातमागावर तयार झालेलें कापड ह्या मालावर नगरपालिकांनीं जकात घेऊं नये असा हुकूम मध्यभारत सरकारनें काढला आहे. घरगुती उद्योगधंद्यांना कारखान्याच्या मालाशीं बाजारांत चढाओढ करतां यावी म्हणून वरील आज्ञा जारी करण्यांत आली आहे.

**कराचींत कापडाची गिरणी**—चालू वर्षअखेर कराचींत आणखी एक कापडाची गिरणी निघणार आहे. ही गिरणी जपानच्या इंजिनिअर्सनीं उभारली असून तींत १ कोटी रुपयांवर भांडवल गुंतविण्यांत आलें आहे. गिरणींत तीन पाळ्या चालविण्यांत आल्या तर रोजीं १५,००० पौंड कापड निघूं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**अँग्लो–इराणियन ऑईल कंपनीच्या सवलती**—अँग्लो–इराणियन ऑईल कंपनी व इराणचें सरकार यांचे दरम्यान तेल उपसण्यासंबंधीं एक करार नुकताच झाला. ह्या कराराला अजून इराणच्या पार्लमेंटची मंजुरी मिळावयाची आहे. करारांतील कांहीं कलमें इराणच्या हितसंबंधाला बाधक आहेत असें म्हणतात.

**एका खान्याचा खर्चः**—गेल्या जून महिन्यांत पंतप्रधान पं. नेहरू सिंगापूरला गेले होते, त्यावेळीं त्यांना तेथील कायदेमंडळातर्फे खाना देण्यांत आला होता. ह्या खान्यासाठीं ५,६३६ रुपये खर्च आला. हा खर्च कोणच्या खातीं खर्ची घालावयाचा ह्यासंबंधीं प्रश्न निर्माण झाल्यामुळें तो सरकारी वाहनांना होणाऱ्या अपघाताखालीं खर्ची घालण्यांत आला.

**सहकारी परिषद्**—म्हैसूर प्रां. सहकारी परिषदेचें ३७ वें अधिवेशन ता. ३० डिसेंबर रोजीं म्हैसूर येथें भरणार आहे. भारतीय सरकारच्या शेतकी खात्याचे चिटणीस श्री. पंजाबी ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे. म्हैसूरच्या शेतकी खात्याचे मंत्री परिषदेचें उद्घाटन करतील.

**सीलोनमध्यें पोलादाचा कारखाना**—सीलोनला दरवर्षी लागणाऱ्या लोखंड व पोलादापैकीं ⅔ लोखंड व पोलाद त्याच देशांत तयार करण्यांत येणार आहे. सीलोनच्या चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत ह्या कारखान्याला लागणाऱ्या भांडवलाची तरतूद करण्यांत आली आहे. कारखाना काढण्याच्या कामीं भारताची मदत घेण्यांत येणार आहे.

**कै. भुलाभाई देसाई ह्यांचा पुतळा**—श्री. भुलाभाई देसाई ह्यांचा पुतळा तयार करण्यासाठीं कलावंतांकडून छातीपर्यंतच्या भागाचे प्लॅस्टरचे नमुने मागविण्यांत आले आहेत. ह्या नमुन्यांनां प्रत्येकीं २५० रुपये सन्माननीय तनखा देण्यांत येणार आहे.

**'ट्यूब' विहिरीसाठीं कर्ज**—मुंबई राज्यांत 'ट्यूब' विहिरी खोदण्यासाठीं भारतीय सरकारनें दोन कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. छोट्या पाटबंधाऱ्यांच्या कामासाठीं दिलेल्या १ कोटी रु. कर्जाची रक्कम स्वतंत्र आहे. अहमदाबाद, मेहसाणा, बनासकांठा आणि साबरमती जिल्ह्यांसाठीं ह्या कर्जाचा उपयोग करण्यांत येणार असल्याचें समजतें.

**उसावरील जकात**—पंजाब स्टेट शुगर केन कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं, नगरपालिकांनीं आपल्या हद्दींत येणाऱ्या उसावर जकात घेऊं नये. रसाच्या मळीवर दर मणामागें सरकार जो १२ आणे कर घेतें त्याचा उपयोग उसाच्या पिकाची वाढ करण्याकडे करण्यांत यावा अशी दुसरी एक सूचना कमिटीनें केली आहे.

**काळी नदीवर धरण**—काळी नदीवर धरण बांधून वीज उत्पन्न करण्याची योजना मुंबई सरकारनें सोडून दिली नसून उलट तिला प्राधान्य दिलें असल्याचें समजतें. मुंबई राज्यांतील पुनर्घटनेची ही एक दूरगामी योजना आहे.

**अमेरिकेचें अल्युमिनियमचें उत्पादन**—अमेरिकेनें आपलें ॲल्युमिनियमचें उत्पादन वार्षिक १,००,००० टनांनीं वाढविण्याचें ठरविलें आहे. शस्त्रास्त्रें तयार करण्याच्या कामीं हा धातू फार महत्त्वाचा असल्यानें सध्यांच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितींत त्याच्या उत्पादनाला साहजिकच महत्त्व आलें आहे.

## रिझर्व्ह बँक आणि शेतीस कर्जपुरवठा

### कायदा–दुरुस्तीची मर्यादित व्याप्ति

रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती करणारें बिल पार्लमेंटनें सिलेक्ट कमिटीकडे सोपविलें आहे. शेतीविषयक हुंड्या रीडिस्कौंट करण्याचा सध्याच्या कायद्यानें रिझर्व्ह बँकेस अधिकार दिलेला आहे, तो नऊ महिने मुदतीच्या हुंड्यांपुरताच मर्यादित आहे. बारा महिने मुदतीच्या हुंड्या रिझर्व्ह बँकेस रीडिस्कौंट करतां याव्यात, अशी सुधारणा दुरुस्ती बिलाचे अन्वयें करण्यांत यावयाची आहे. ह्या बिलावर पार्लमेंटमध्यें चर्चा झाली, तिला उत्तर देतांना अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं शेतकऱ्यांना लागणाऱ्या कर्जाच्या पुरवठ्याविषयीं परिस्थिति स्पष्ट करून सांगितली. अशा कर्जपुरवठ्याचा प्रश्न अत्यंत बिकट असल्याचें त्यांनीं मान्य केलें, परंतु पुरेशा आकडेवार माहितीचे अभावीं ह्या बिकटपणाची खरी तीव्रता स्पष्ट होऊं शकत नाहीं. इंडस्ट्रियल फिनॅन्स कॉर्पोरेशनप्रमाणेंच एक मध्यवर्ती ॲग्रिकल्चरल फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन करण्यांत यावी असें एका माजी अर्थमंत्र्यांनीं सुचविलें होतें. परंतु रिझर्व्ह बँकेनें तसें करणें कसें अव्यवहार्य आहे, हें दाखवून दिलें होतें. अशा तऱ्हेच्या संस्था कांहीं देशांतून असल्या तरी तो दाखला भारतांत उपयोगी पडण्याजोगा नाहीं. आपल्या इकडे शेती फार लहान प्रमाणावर केली जाते आणि त्यामुळें अखिल भारतीय स्वरूपाच्या संस्थेला अशा असंख्य लहान घटकांवर देखरेख ठेवणें अशक्य होईल. प्रांतिक संस्थाच अधिक श्रेयस्कर ठरतील. मुंबई आणि उत्तर प्रदेश ह्या राज्य सरकारांनीं शेतीस कर्जे पुरविणाऱ्या संस्था घटक राज्यांगणिक असाव्यात हें मान्य केलें आहे. सध्यां अस्तित्वांत असलेल्या सहकारी संस्थांमार्फत कर्जपुरवठ्याचें हें काम करण्यांत यावें, असें मुंबई सरकारचें मत असून त्या दृष्टीनें कांहीं प्रगतीहि झाली आहे. पंजाब, बिहार आणि ओरिसा सरकारांना प्रांतिक संस्था अधिक योग्य ठरतील हें पटलें असलें तरी त्यांना आवश्यक तो पैसा उभारतां येणार नाहीं, अशी भीति वाटते. प्रांतिक सहकारी बँकांना एका अखिल भारतीय ॲ. फि. कॉर्पोरेशननें अल्प दरानें कर्ज पुरवावें, अशी आसाम सरकारची सूचना आहे. फिनॅन्स कॉर्पोरेशनचा प्रश्न यूनियन (मध्यवर्ती) सरकारच्या कक्षेंतील असल्यामुळें घटक (राज्य) सरकारांना अशीं कॉर्पोरेशन्स काढण्याचा अधिकारच नाहीं, असें प. बंगालच्या सरकारला वाटतें. मध्यवर्ती सरकारच्या संस्थेमार्फत शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याचें काम नीट होण्याजोगें नाहीं, असें आपलें स्पष्ट मत श्री. देशमुख यांनीं व्यक्त केलें आहे.

प्रस्तुत बिलानें नऊ महिन्यांऐवजीं बारा महिने मुदतीच्या रीडिस्कौंटची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळें अल्पशा प्रमाणांत रिझर्व्ह बँकेच्या मदतीचा जास्त उपयोग होऊं शकणार आहे. कारण, व्याजाच्या दरानें शेतीच्या व्यवहारास भांडवलाचा पुरवठा करण्याचा व्यापक प्रश्न तेवढ्यानेंच सुटणार नाहीं. सहकारी संस्थांचें कार्य आणखी वाढलें आणि शेतकऱ्यांना आपला माल विक्री होईपर्यंत ठेवण्यासाठी कोठारांची सोय झाली तरच रिझर्व्ह बँकेमार्फत कर्जपुरवठा वाढत्या प्रमाणावर होणें शक्य होईल. रिझर्व्ह बँकेनें गेल्या कांहीं वर्षांत शेतीच्या कर्जपुरवठ्याकडे अधिकाधिक लक्ष देण्यास प्रारंभ केला आहे आणि शेतीला बँकेचा पुरेसा उपयोग होऊं शकत नाहीं. त्याचें खापर सर्वस्वी बँकेवरच फोडणें न्यायाचें होणार नाहीं. बँक रेटपेक्षां १½% कमी दरानें रिझर्व्ह बँक सहकारी बँकांना हुंड्या रिडिस्कौंट करून देण्यास आणि त्यांना अल्प मुदतीचीं कर्जे देण्यास तयार असूनही त्याचा पुरेसा फायदा घेतला जात नाहीं, ह्याचें रहस्य स्पष्ट आहे. सहकारी संस्थांचा विस्तार बराच होण्यास वाव आहे आणि शेतीच्या मालाच्या विक्रीच्या पद्धतशीर सोईचा अभाव आहे, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

---

## रेल्वे इंजिनांच्या उत्पादनास प्रारंभ

तीस वर्षांपूर्वींच, सरकारास इंजिनांचें भारतांतच उत्पादन करण्याचें महत्त्व पटलें होतें. १९२१–२४ च्या दरम्यान त्या संबंधांत केलेले प्रयत्न यशस्वी झाले नाहींत. इंजिनें तयार करण्यासाठी स्थापन केलेली पेनिन्सुलर लोकोमोटिव्ह कंपनी पुरेशा पाठिंब्याच्या अभावीं कामास सुरवातहि करूं शकली नाहीं. १९३४ सालापासून १९३९ पर्यंत काँग्रेस पक्षानें ह्या संबंधांत मध्यवर्ती असेंब्लींत पुष्कळ खटपट केली. अखेर जुलै, १९३९ मध्यें सरकारनें भारतांत इंजिनें बनविण्याच्या शक्यतेच्या आणि व्यावहारिकपणाच्या संबंधीं चौकशी करण्यासाठी हंफ्रेज-श्रीनिवासन कमिटी नेमली. तिनें अनुकूल रिपोर्ट केला. दुसऱ्या युद्धकाळांत हें काम तसेंच पडून राहिलें.

१९४६ सालीं सरकारनें कांचनपारा येथें लोकोमोटिव्ह वर्कशॉप स्थापन करण्याचें ठरविलें, परंतु फाळणीमुळें वर्कशॉपसाठी दुसरी जागा निवडावी लागली. कलकत्त्यापासून १५० मैलांवरील मिहिजम (आतां त्याला चित्तरंजन म्हणतात) येथें वर्कशॉप स्थापन करण्यांत आलें आहे. ह्या वर्कशॉपच्या उभारणीसाठी आतांपर्यंत १५ कोटी विटा, ६० लक्ष पोकळ कॉंक्रीट ब्लॉक (४·२ कोटी विटांची जागा व्यापणारें), ७०,००० टन सिमेंट, १,५०० टन लाकूड, २०,००० गॅलन रंग, ११,००० टन पोलाद वर्कशॉपसाठी आणि १६,००० टन पोलाद नोकरांच्या घरांसाठी, १२० मैल लांबीचे पाण्याचे नळ आणि १०० मैल लांबीचे ड्रेनेजचे नळ इतका माल लागला आहे. उभारणीच्या कामापैकी ८०% काम पुरें झालें आहे. दामोदर व्हॅली योजनेंतून वीज मिळेपर्यंत तेलशक्तीवर तयार केलेली वीज वापरण्यांत येणार आहे. एक इंजिन बनविण्यासाठी १,००,००० युनिट वीज खर्च होते!

वर्कशॉपमधील उत्पादनाचें ध्येय खालील तक्त्यांत नमूद केलें आहे:—

| वर्ष अखेर | तयार करावयाचीं इंजिनें | सुट्या भागांपैकीं किती % तयार होणार |
|---|---|---|
| १९५० | ३ | — |
| १९५१ | ३३ | ३० |
| १९५२ | ४५ | ७० |
| १९५३ | ६६ | ८० |
| १९५४ | ९० | १०० |

म्हणजे, १९५४ अखेर पहिलें खरें ‘ चित्तरंजन इंजिन ’ तयार होईल. चित्तरंजन वसाहतींत ५,००० कामगार व त्यांचीं कुटुंबें ह्यांची रहाण्याची व्यवस्था होणार आहे.

---

**जर्मन औषधी कंपनीची मदत**—औषधें तयार करणारी एक सुप्रसिद्ध जर्मन कंपनी एका भारतीय कंपनीशीं सहकार्य करून कलकत्त्याजवळ एक औषधांचा कारखाना काढणार आहे. आपल्या औषधी क्रिया वरील कंपनी भारतीय कंपनीला पुरविणार आहे.

## गेल्या पांच वर्षांतील टॅरिफ बोर्डाची कामगिरी

(१)

### संरक्षित धंद्यांवर नजर

टॅरिफ बोर्डाला १९४९ पासून निरनिराळ्या धंद्यांकडून संरक्षण अथवा मदत यासाठीं करण्यांत येणाऱ्या मागण्यांचीच चौकशी करावी लागली असें नव्हे, तर आवश्यक तेव्हां विविध वस्तूंच्या किंमतींच्या बाबतींत चौकशी करून सरकारला सल्ला देण्याचें कामही त्याला करावें लागलें. संरक्षित धंद्यांची प्रगती मजबूत पायावर होऊं देण्याच्या दृष्टीनें बोर्डाला अशा धंद्यांच्या प्रगतीवर सतत नजर ठेवावी लागली.

बोर्डानें केलेल्या शिफारशींनुसार युद्धकाळांतील ३४ धंद्यांना संरक्षक जकातीच्या स्वरूपांत संरक्षण देण्यांत आलें असून त्यांत मिश्रधातु, उपकरणें व विशिष्ट प्रकारचें पोलाद, कापड बनविण्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री, ॲल्युमिनियम, इतर निर्लोह धातू आणि सोडा ॲश, यांसारख्या मूलभूत धंद्यांचा समावेश आहे. कॉस्टिक सोडा व ब्लीचिंग पावडर यांचे बाबतींत कांहीं अटी पूर्ण झाल्यास एका फर्मला आर्थिक साह्य देण्याची शिफारस करण्यांत आली होती. परंतु सदरहू फर्मकडून या अटी पूर्ण न झाल्यामुळें आर्थिक साह्य देण्यांत आलें नाहीं. अल्युमिनियमचे बाबतींत दोन कारखानदारांना संरक्षक जकातीशिवाय इतरहि आर्थिक साह्य पुरविण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें सोडा ॲशचे बाबतींतही विक्रीच्या आधारावर उत्पादनासाठीं आर्थिक साह्य मंजूर करण्यांत आलें आहे. सोडा ॲशशिवाय क्लोराइड बायक्रोमेटस, छायाचित्रांसाठीं लागणारीं रसायनें, स्टार्च, पोटॅशियम परमँगनेट, स्टीअरिक ॲसिड व ऑलेइक ॲसिड, प्लास्टिक्स व कॅल्शियम लॅक्टेट यांसारख्या रसायनांच्या इतर अनेक शाखांचे बाबतींत संरक्षण देण्यांत आलें. संरक्षण मिळालेल्या दुसऱ्या महत्त्वाच्या वस्तूंत इलेक्ट्रिक मोटारी, सायकली, शिवण्याचीं यंत्रें, मोटार वाहनांच्या बॅटरी, यांचा समावेश आहे.

### ग्राहकांचें हित

बोर्डानें संरक्षणाविषयीं शिफारशी करतांना नेहमीं ग्राहकांच्या हिताकडेहि लक्ष दिलें आहे. कांहीं बाबतींत देशांतील कारखानदारांचा उत्पादन खर्च त्याच प्रकारच्या आयात केलेल्या मालाच्या किंमतीहून कमी असल्याचें दिसून आल्यामुळें बोर्डानें त्या धंद्यांस संरक्षण देण्याची शिफारस केली नाहीं. इतर बाबतींत, विशेषतः युद्धकाळांतील ज्या धंद्यांना सर्वसाधारण शांततेच्या काळांत टिकून राहाण्यासाठीं प्रमाणापेक्षां जास्त जकात बसविण्याची आवश्यकता होती, अशांना संरक्षण देण्याचा विचार करतांना बोर्डानें अत्यंत सावधगिरी बाळगिली असून त्यास असें दिसून आलें आहे कीं, उत्पादन खर्चाच्या आधारावर संरक्षण देणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें योग्य नाहीं. याहूनही इतर कांहीं बाबतींत तर संरक्षण अथवा साह्य यासाठीं करण्यांत आलेली मागणी अवेळीं असल्याचा बोर्डानें आपला निर्णय दिला. अशा रीतीनें बोर्डानें निवडक धंद्यांना संरक्षण देण्याचें तत्त्व पाळल्यामुळें युद्धकाळांतील सुमारें १५ धंद्यांनासुद्धां संरक्षण किंवा साह्य देण्याच्या शिफारशी तें करूं शकलें नाहीं. त्याचप्रमाणें सुती कापडाचे कारखाने, लोखंड व पोलाद, कागद व लाकडाचा लगदा, मॅग्नेशियम क्लोराइड, जरतार आणि साखर या सहा जुन्या धंद्यांचें संरक्षण रद्द करण्याची शिफारस बोर्डानें केली. तथापि राष्ट्रीय हितसंबंध किंवा सामाजिक फायदे या दृष्टीनें वाढ होण्याची गरज असलेल्या ज्या कांहीं धंद्यांना जादा जकातीच्या रूपानें संरक्षण देण्याची आवश्यकता आहे अशी बोर्डाची खात्रीं पटली, तेथें त्यानें प्रत्यक्षपणें अधिक संरक्षण दिलें किंवा चालू संरक्षण जकातींत वाढ केली. उदाहरणार्थ, टिकविलेलीं फळें, मोटार वाहनांच्या बॅटऱ्या, सायकली व स्टार्च.

ऑक्टोबर १९५० च्या असेरीस खालीं नमूद केलेल्या ३४ धंद्यांतील मालास संरक्षक जकातींचा फायदा मिळत होता. मिश्रधातु, उपकरणें व विशिष्ट प्रकारचें पोलाद, ॲल्युमिनियम, कृत्रिम रेशमी कापड, बायक्रोमेटस्, सायकली, बेल्टिंग, कॅल्शियम क्लोराईड, कोटेड ॲब्रेसिव्ज, कोको पावडर व चॉकोलेट, कापड कारखान्यांतील यंत्रसामुग्री, ड्रॉय बॅटऱ्या, मोटार वहानांच्या बॅटऱ्या, विजेच्या मोटारी, फेरो सिलिकॉन, ग्ल्यूकोज, चक्क्या, हरिकेन कंदील, निर्लोह धातु, ऑलेइक ॲसिड, स्टीअरिक ॲसिड, पिकर, छायाचित्रांसाठीं लागणारीं रासायनें, प्लास्टिक्स, प्लायवूड व चहाचे खोके, टिकविलेलीं फळें, शिवण्याचीं यंत्रें, शीट ग्लास, सोडा ॲश, स्टार्च, वूड स्क्रू, फाउंटनपेनची शाई, कॅल्शियम लॅक्टेट, आणि साबुदाणा (टॅपिओका). आगकाड्यांवर जादा संरक्षक जकात असून ती युद्धपूर्व कालापासून पुढें चालू ठेवण्यांत आली आहे हें नमूद केलें पाहिजे.

### एकमतानें पास झालेलीं प्रतिवृत्तें

बोर्डानें आतांपर्यंत सादर केलेलीं शंभराहून अधिक प्रतिवृत्तें बोर्डाच्या सदस्यांनीं एकमतानें मान्य केलेलीं असून त्यांत एकही भिन्न मतपत्रिका नाहीं. बोर्डानें आपल्या विचाराचे बाबतींत दाखविलेलें मतैक्य आणि तज्ज्ञमंडळ म्हणून त्यास असलेला अधिकार या गोष्टी त्यानें केलेल्या जवळ जवळ सर्व शिफारशी मान्य करतांना सरकारनें विचारांत घेतल्या आहेत. यंत्रांचीं हत्यारें या केवळ एकाच बाबतींत संरक्षण देण्यासाठी बोर्डानें केलेल्या शिफारशी सरकारनें स्वीकारल्या नसून त्याचें मुख्य कारण या धंद्याचा मजबूत पायावर विकास करण्यासाठी केवळ संरक्षणाहून अधिक निश्चित उपायाची आवश्यकता आहे असें सरकारला वाटलें हें होय.

टॅरिफ बोर्डाच्या शिफारशींचे दुसरें एक महत्त्वाचें वैशिष्ट्य असें कीं, त्यानें केवळ संरक्षक जकातींच्याद्वारें धंद्यांची मजबूत पायावर वाढ होणें बहुधा शक्य नसून, संरक्षण किंवा सरकारी मदत या वाचून ते यशस्वी रीत्या चालू राहण्याच्या दृष्टीनें त्यांची योग्य अशा कालावधींत वाढ होण्यास इतर प्रकारच्या साह्याचीहि आवश्यकता आहे, या गोष्टी ओळखल्या आहेत हें होय.

(अपूर्ण)

---

### बटाटे पिकविणाऱ्या गरीब शेतकऱ्यांना तगाई कर्जे

मुंबई राज्यांतील गरीब शेतकऱ्यांना शेतकी खात्याकडून बियाणाचे बटाटे आणि खत विकत घेतां यावें म्हणून मुंबई सरकार १९५०–५१ च्या रब्बी हंगामांत त्यांना तगाईबद्दल २० लक्ष रु. देणार आहे. हीं कर्जे जिल्ह्याचे कलेक्टर देतील. त्यावर ५½ टक्के व्याज आकारण्यांत येईल. कर्जें रब्बी हंगामानंतर मात्र ता. ३० जून १९५१ च्या पूर्वी वसूल करण्यांत येतील.

एकाद्या जिल्ह्यांत द्यावयाच्या कर्जाची एकूण रकम त्या जिल्ह्यांत शेतकी खात्यानें विक्रीसाठीं ठेवलेल्या बियाण्यांच्या बटाट्याच्या व इतर खताच्या एकूण किंमतीपेक्षां जास्त असणार नाहीं.

बटाट्यांची लागवड करणाऱ्या अकरा जिल्ह्यांना ही योजना लागू असून ते जिल्हे पुढीलप्रमाणें आहेतः— बनासकांठा, अहमदाबाद, खेडा, पुणें, नाशिक, अहमदनगर, उत्तर सातारा, बडोदें, मेहसाणा, कोल्हापूर आणि बेळगांव.

## भारताचा सिमेंटचा धंदा

भारताची सध्यांची अर्थव्यवस्था संमिश्र स्वरूपाची असल्याचें आणि कांहीं काल तरी ती तशीच ठेवण्याचें ध्येय पंतप्रधान नेहरू यांनीं जाहिर केलेलेंच आहे. खाजगी मालकीचे धंदे हा ह्या अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे. ह्या उद्योगधंद्यांचा विकास आणि त्यांच्या मार्गांतील अडचणी समजावून घेण्यासाठीं सरकारचें नियोजन मंडळ सध्यां निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या प्रतिनिधींशीं विचारविनिमय करीत आहे.

सीमेंट तयार करणाऱ्या कारखान्यांच्या प्रतिनिधींशीं चर्चा करण्यासाठीं एक बैठक भारत सरकारनें भरविली होती. ह्या बैठकींत सीमेंटच्या धंद्यासाठीं एक पंचवार्षिक कार्यक्रम आंखण्यासंबंधीं वाटाघाटी झाल्या असें समजतें. बैठकींत जो उहापोह करण्यांत आला त्यावरून असें दिसून आलें कीं १९४९ सालीं सीमेंटचें प्रत्यक्ष उत्पादन २१ लाख टन झालें. भारतांत सीमेंटचें एकूण २१कारखाने असून त्यांची जास्तींत जास्त वार्षिक उत्पादनक्षमता २९,३१,००० टन आहे असा अंदाज १९५० चे आरंभीं करण्यांत आला आहे. चालू कारखान्यांचा विस्तार करून आणि नवे कारखाने काढून ही उत्पादनक्षमता वाढवितां येणें शक्य आहे असेंही आढळून आलें. १९५२ च्या प्रारंभीं ४१,६५,००० टन आणि १९५५ च्या सुमारास ४५,१५,००० टन सीमेंट उत्पन्न होऊं शकेल असा अंदाज करण्यांत आला. आर्थिक दृष्ट्या परवडणारा असा सीमेंटचा कारखाना केवढा असावा आणि त्याची तांत्रिकदृष्ट्या उत्पादनक्षमता कशी ठरवावी ह्याविषयींही बैठकींत बरीच चर्चा झाली. त्याचप्रमाणें धंद्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा, जळणासाठीं लागणारें तेल, रेल्वेच्या वहातुकीचे दर, इत्यादि प्रश्नांचाही विचार करण्यांत आला. देशांत तयार होणाऱ्या सीमेंटचा भाव अधिक असण्याचीं कारणें म्हणून वरील बाबींकडे बोट दाखविण्यांत आलें. भारतांतील सीमेंटची मागणी कमी झाली तर इराण व आसपासच्या इतर देशांतून बाजारपेठा मिळण्याचा संभव कितपत आहे ह्यासंबंधीं चौकशी करण्यांत यावी असेंही सुचविण्यांत आलें. भारतीय सरकारच्या विकास योजना द्रव्याच्या अभावीं स्थगित करण्यांत आल्या अगर सीमेंटसाठीं होणारी नागरी मागणी कमी झाली तर सीमेंटच्या कारखान्यांना बाजारपेठांची पंचाईत पडूं नये म्हणून आतांपासून विचार चालू झाला आहे. परदेशांत बाजारपेठा मिळविण्यासाठीं चढाओढींत टिकतील अशा स्थिर किंमती ठेवल्या पाहिजेत ह्याची जाणीवही बैठकींत दिसून आली.

भारतांत कृत्रिम खताचे कारखाने निघूं लागले आहेत. ह्या कारखान्यांना लागणारें 'जिप्सम्' हें खनिज सीमेंटच्या धंद्यालाही लागतें. अर्थातच ह्या दोन धंद्यांत ह्या खनिजासाठीं स्पर्धा निर्माण होऊन पुरवठा अपुरा पडण्याची भीति आहे. देशांत सध्या उपलब्ध होणारें 'जिप्सम्' सीमेंटच्या कारखान्यांनाच पुरेसें आहे असें बैठकींत दाखवून देण्यांत आलें. ह्याशिवाय सीमेंटचें जास्तींत जास्त उत्पादन कसें करावें, कारखान्यांची यंत्रसामुग्री देशांतच तयार कशी करावी, संशोधन कसें करावें, किंमती कशा ठरवाव्या इत्यादि मुद्यासंबंधींही बैठकींत चर्चा करण्यांत आली. ह्या विचारविनिमयाचा फायदा घेऊन नियोजन मंडळ सीमेंटच्या धंद्यासाठीं एक पंचवार्षिक कार्यक्रम लवकरच आंखील असें समजतें.


दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—६७, अपोलो स्ट्रीट, सोनावाला बिल्डिंग, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर.

रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं.२२७३८






## वाढत जाणाऱ्या किंमतींना आळा घालण्याचें ग्रेट ब्रिटनचें धोरण

जगांतील इतर बहुतेक सर्व देशांप्रमाणें ग्रेट ब्रिटनपुढेंहि मालाच्या वाढत जाणाऱ्या किंमतीला कसें तोंड द्यावें हा प्रश्न आहे. ब्रिटनच्या अर्थमंत्र्याचें याहि परिस्थितींत असें मत आहे कीं, कांहीं झालें तरी ब्रिटनच्या मालाच्या किंमतींत दोन टक्क्यांहून जास्त वाढ होणें शक्य नाहीं. अंतर्गत मालाच्या किंमती वाढूं नयेत या-साठीं ब्रिटिश सरकार पुढील प्रकारचे उपाय योजणार आहे. पहिली गोष्ट म्हणजे एप्रिलमध्यें सादर केलें जाणारें अंदाजपत्रक खर्चाची तोंडमिळवणी साध्य करणारें असून चलनवाढ कमी करण्याचाहि त्याचा उद्देश असेल. अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी साधण्या-साठीं जरूर तर करवाढ केली जाईल. किंमतीचें मान आटोक्यांत आणण्यासाठीं वस्तूंच्या भावांवर नियंत्रण चालू राहील व धान्य पुरवठ्याच्या बाबतींतहि सरकारकडून मदत देण्यांत येईल. जरूर तर भांडवली खर्चांतहि काटकसर करण्यांत येईल. मजूर व इतर संघटनांना मजुरांनीं व कामगारांनीं मजुरीच्या वाढत्या दरांबद्दल मागणी करूं नये अशा तऱ्हेची विनंति करण्यांत येईल. बचती-च्या योजनांना उत्तेजन दिलें जाईल. उद्योगधंद्यांतील उत्पादन-क्षमता वाढविण्याचे विशेष रीतीनें प्रयत्न केले जातील.

आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीनें यंदाच्या वर्षी निर्माण झालेली नवी अडचण म्हणजे अवमूल्यनानंतर ब्रिटनच्या कारखान्यांना आवश्यक लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती वाढत चालल्या. अमेरिकेमध्यें उद्योगधंदे तेजींत असल्यामुळें किंमतींची वाढ होण्यास आणखी मदत झाली; व कोरियन युद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळें लष्करी खर्च वाढविण्याची प्रवृत्ति सर्व ठिकाणीं निर्माण होऊन मालाच्या किंमती वाढण्यास आणखी मदत झाली. सप्टेंबर १९४९ मध्यें ब्रिटनमध्यें आयात होणाऱ्या सर्वसाधारण मालाच्या किंमतींचा निर्देशांक ११० होता तो १९५० च्या सप्टेंबर महि-न्यांत १३७ झाला. परंतु या आयात होणाऱ्या मालापैकीं कच्च्या मालाच्या किंमतींचा निर्देशांक ११८ होता तो आतां एका वर्षात १६३ झाला आहे. या आंकड्यांवरून वाढत जाणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतींचा परिणाम तयार मालावर व इतर मालावर होईल हें अगदीं नैसर्गिक दिसतें. हा अनुभव किंमतींच्या रीतीनें व्यवहारांत दिसावयास कदाचित् सहा महिने ते एक वर्ष एवढा कालावधि लागेल.

१९४८ पासूनच ब्रिटनमध्यें मजुरीचे दर आटोक्यांत राहण्या-बद्दल चळवळ सुरू झाली आहे व मजुरीच्या दरांत जानेवारी १९४८ मधल्या १०४ निर्देशांकापासून जानेवारी १९५० च्या ११० निर्देशांकापर्यंत वाढ झाली असली तरी ही वाढ अगदीं बेताची असून १९५० च्या पहिल्या आठ महिन्यांत मुळींच वाढ झाली नाहीं. मजुरीच्या दरांत विशेष वाढ झाली नसली तरी जादा काम केल्यामुळें व नेमून दिलेल्या कामावर बोनस दिल्यामुळें मजुरांच्या प्राप्तींत थोडीशी भरच पडली आहे. १९४७ ते ५० ह्या तीन वर्षांच्या दरम्यान राहाणीचा खर्च १४ टक्क्यांनीं वाढला परंतु मजुरींत २० टक्के वाढ झाल्यामुळें मजूर वर्गाच्या हातीं प्रत्यक्ष मालाच्या रूपानें जास्त पैसा आला आहे. मजुरीच्या दरांत प्रत्यक्ष वाढत जाणारें उत्पादन लक्षांत घेऊनच वाढ केली जाईल. उत्पादनांत चालू वर्षी ८ टक्के वाढ, प्रत्यक्ष मजुरांच्या संख्येंत वाढ होऊन साध्य झाली.

---

## भारताच्या संसदेंत......
## अन्नमंत्र्यांची ईशकृपेसाठी प्रार्थना!

राष्ट्रपतींनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत वाढत्या महागाईचा उल्लेख करून अकरा वस्तूंच्या पुरवठ्यावर व किंमतीवर नियंत्रण घातल्याचा उल्लेख केला. आयात नियंत्रणें सैल करणार असल्याचेंही सांगितलें. समाजविरोधी कार्य करणाऱ्यांविरुद्ध कडक उपाययोजना केली जाईल असा इशारा दिला.

पूर व अवर्षणें ह्यामुळें अन्नपरिस्थिति कठीण असून बिहारमध्यें परिस्थिति विशेष काळजीची असल्याचेंही त्यांनीं स्पष्ट केलें.

लोकप्रतिनिधींनीं देशांतील अन्नपरिस्थिति अत्यंत गंभीर असून वेळींच काळजी न घेतली तर देशांत क्रांति होईल इतकें वातावरण स्फोटक असल्याचा सरकारला इशारा दिला. वर्तमानपत्रांनीं प्रसिद्ध केलेली माहिती सरकार खरी मानीत नाहीं, लोकांत राहाणाऱ्या पुढा-ऱ्यांनीं दिलेल्या सल्ल्याकडे मंत्री लक्ष देत नाहींत, असा जबाबदार मंडळींनीं आरोप केला. क्युबाची स्वस्त साखर मिळत असतांना ती नको असें सरकारनें सांगितलें आणि आतां इंग्लंडकडून भारी किंमतीनें साखर घेण्यांत येत आहे. बर्मा तांदुळाबद्दल पंतप्रधा-नांनींच सांगितलें कीं, भारत सरकारच्या स्वयंपूर्णतेच्या घोषणेमुळें बर्मा सरकारनें भारत सरकारला तांदूळ विकला जाणार नाहीं अशा समजुतीनें तो देऊं केला नाहीं. आतां त्याबद्दल बोलणीं चालू केलीं आहेत.

सरकारी अधिकाऱ्यांना स्वतःपलीकडे दिसत नाहीं, ते कृतिशून्यच नसून कांहींजण अलिखित करार, खोटीं बिलें व त्यांचे पैसे देणें अशासारख्या व्यवहारांत सांपडल्याचें सरकारदरबारीं नमूद झालें आहे.

दैनंदिन हवामान व पाऊस यांवर आपली शेती अवलंबून असतांना हवामान खराब होणें, पाऊस कमीजास्त पडणें, यासारख्या गोष्टी लक्षांत धरूनच अन्न–पुरवठ्याची व्यवस्था करणें सूज्ञ सर-कारचें काम आहे, असें सरकारला स्पष्ट करून सांगण्यांत आलें.

रेशनचें धान्य व त्याच्या नियंत्रित किंमती याचा फायदा फक्त १० टक्के जनतेला मिळतो. ज्या सरकारला पुरेसें अन्नही पुरवितां येत नाहीं त्यानें रामराज्याची भाषा न बोललेली बरी असेंहि सरकारला बजावण्यांत आलें.

कोरियांतील युद्ध एकदम सुरू होईल आणि साखरेच्या किंमती भडकतील अशी कल्पना नव्हती, असें अन्नमंत्र्यांनीं सांगितलें. सरकार त्याबाबत चौकशी करण्यास तयार असल्याचेंहि जाहीर करण्यांत आलें.

परदेशांत खरेदी केलेल्या ६०,०५० टनांपैकीं ५,५५० टन साखर भारतांत आल्याचें सांगण्यांत आलें. हल्लींच्या रेशनप्रमाणें वर्षाला निदान १०,५०,००० टन साखर एकूण पाहिजे.

अन्नमंत्र्यांनीं असेंही जाहीर केलें कीं, सध्याची कठीण परि-स्थिति लक्षांत घेऊन या वर्षी ठरविलेल्या १५,००,००० टनां-ऐवजीं ३२,००,००० टन धान्य परदेशांतून आणावयाचें ठरलें आहे. आणि अशी तुटीची परिस्थिति कायम असेतोंपर्यंत सरकार शक्य तितकें धान्य आयात करील.

१९५२ च्या मार्चपर्यंत भारत अन्नाबाबत स्वयंपूर्ण होईल, इतकेंच नव्हे तर कपाशीबाबतही १०० टक्के स्वयंपूर्णता येईल. तागाच्या लागणाऱ्या ७२ लक्ष गांठींपैकीं ६१ लक्ष गांठी देशांतच तयार होतील.

उत्तर भारतांत डिसेंबर मध्यापर्यंत तयार होणाऱ्या एक लाख टन साखरेवर मणाला रु. २–६ मदत सरकार देणार आहे.

"ईशकृपेनें आपण अडचणींतून पार पडूं" असा आशावाद अन्नमंत्र्यांनीं अखेर प्रदर्शित केला!

× × × ×

चण्याचा दर पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, पेप्सुमध्यें मणीं रु. ९ ते १०, मुंबईत रु. ३५, मद्रासमध्यें रु. ६०.

× × × ×

सरकारी खात्याकडून आलेल्या माहितीप्रमाणें, खर्चात विशेष काटकसर होणार नाहीं.

× × × ×

स्वीडिश कंपनीचीं तयार घरें ठरल्याप्रमाणें आढळलीं नाहींत. त्याकरितां सरकारनें कंपनीला द्यावयाची बाकी रक्कम रुपये २,३६,२०० रु. अडकवून ठेविली आहे. नुकसानभरपाईबाबत स्वीडिश वकिलामार्फत बोलणीं चालू आहेत. कंपनीविरुद्ध कायदेशीर इलाजही करण्यांत येत आहे.

× × × ×

बंगलोर येथील हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट कारखान्यांत रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाचे १५० डबे बांधण्यांत येत आहेत.

× × × ×

चित्तरंजन येथील रेल्वे इंजिनांच्या कारखान्यांत गेले सहा महिने कांहीं सुटे भाग तयार करण्यांत येत आहेत. परदेशी सुटे भाग एकत्र जोडून पहिलें इंजिन १ नोव्हेंबरला राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांचे हस्तें बाहेर पडलें. १९५४ च्या सुमारास सर्व सुटे भाग तयार होऊं लागतील.

× × × ×

सिंधरी खताच्या कारखान्याचें बांधणीकाम संपत आलें आहे. ५१ च्या सप्टेंबरच्या सुमारास ½ उत्पादनाची तयारी होईल. आणखी सहा महिन्यांनीं पुरें उत्पादन निघेल.

× × × ×

नियोजन समितीची पहिली सभा २८ मार्चला. जुलैच्या सुमारास कचेरींतील अधिकारी, कारकूनमंडळी रुजू होऊन कामास सुरवात. अल्प मुदतीची योजना २ महिन्यांत जाहीर होईल. पंचवार्षिक कार्यक्रम त्यानंतर बाहेर पडेल.

गेल्या तीन वर्षांतील औद्योगिक उत्पादनाचे आढ आलेल्या अडचणींची नोंद समितीनें केली आहे. निरनिराळ्या धंद्यांतील पुढील पांच वर्षांतील उत्पादनाचे कार्यक्रम ठरविण्यांत येत आहेत. समिती लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार प्रामुख्यानें करीत आहे.

—संजय

**जपानी बॉयलर्सना मागणी**—मुंबई सरकारनें एका जपानी कंपनीकडे ७८ लाख रुपये किंमतीच्या बॉयलर्सची मागणी केली आहे. त्याचप्रमाणें, एका जर्मन कंपनीकडून टर्बाइन्स विकत घेण्याचें ठरविलें आहे.

**कोरिआंतील युद्ध आणि कॉफी**—कोरिआंतील युद्धाच्या परिस्थितींत अनपेक्षित फरक पडल्यामुळें अमेरिकेंतील हॉटेलवाल्यांनीं कॉफीच्या एका कपाची किंमत ५ सेंटची १० सेंट केली आहे. आतांपर्यंत कॉफीच्या बियांच्या भावांत झालेला चढउतार त्यांनीं सहन केला होता.

### औषधांचा नवीन कारखाना

अमेरिकेंतील स्क्विब ॲण्ड सन्स ह्या सुप्रसिद्ध औषधी कारखान्यानें भारतांतील साराभाई केमिकल्स ह्या कंपनीशीं सहकार्य करण्याचें ठरविलें आहे. ही अमेरिकन कंपनी ह्या धंद्यांत आंतरराष्ट्रीय कीर्ति पावलेली आहे. जीवनसत्त्वें आणि आहारसत्त्वें औषधाच्या रूपानें तयार करणारी ही फार मोठी कंपनी आहे. अनेस्थेटिक्स, बायॉलॉजिकल्स, सल्फा ड्रग्स, स्ट्रेप्टोमिसिन, इ. अनेक प्रकारचीं औषधें वरील कंपनी तयार करते. अलिकडे अनेक रोगांवर रामबाण म्हणून वापरण्यांत येणारें पेनिसिलीन हें औषध तर सर्व जगांत ही कंपनी इतरांपेक्षा अधिक प्रमाणांत तयार करते. साराभाई केमिकल्स आणि स्क्विब ह्यांच्यांत झालेल्या करारांत एक विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. ती म्हणजे, तयार होणाऱ्या औषधांचा दर्जा चांगला राखण्याची अट. स्क्विब कंपनीचे तज्ज्ञ आतां बडोद्याला आले असून त्यांनीं प्राथमिक कार्याला प्रारंभ केला आहे. साराभाई केमिकल्स कंपनीचे तंत्रज्ञहि अमेरिकन कंपनीच्या न्यूयॉर्क येथील कार्यालयांत अधिक शिक्षण घेण्यासाठीं गेले आहेत. आधुनिक औषधें तयार करण्याच्या अद्यावत् पद्धतींचा अभ्यास ते करणार आहेत. स्क्विब कंपनीची स्वतःची मोठी वैद्यकीय प्रयोगशाळाही आहे. परकीय संशोधनाचा आणि अनुभवाचा फायदा साराभाई केमिकल्स ह्या कंपनीला मिळून भारतांतील औषधाची एक मोठी कंपनी म्हणून ती पुढें येईल असा अंदाज करण्यास हरकत नाहीं.

### म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहर

वरील कंपनीस ३० जून १९५० अखेर संपलेल्या वर्षी १,१७,११९ रु. नफा झाला. भागीदारांना ६% डिव्हिडंड मिळणार आहे. १९४२ सालीं कंपनीच्या कामास प्रारंभ झाला, त्या वेळीं कंपनीची मालमत्ता ३,८५,२६१ रु. होती ती आतां २५,३१,८२३ रु. झाली आहे. वसूल भांडवल ४,९७,६५० रु. वरून १२,७२,९०० रु. वर गेलें आहे. वार्षिक उलाढाल २,९७,९०२ रु. ची २४,७२,०२५ रु. पर्यंत पोंचली आहे. रिझर्व्ह व इतर फंडांत १९,५३,७८७ रु. आहेत. कामगारांची संख्या ९३७ आहे. वाढत्या धंद्यासाठीं कंपनी आपलें भांडवल ५ लक्ष रु. नीं वाढविणार आहे. युरोपांतील देशांचें लक्ष युद्ध प्रयत्नाकडें केंद्रित झालें असल्यामुळें परदेशी मशीन टूल्सची आयात रोडावली आहे. त्यामुळें कारखान्याच्या उत्पादनांत वाढ करण्याचा हा समय फार सोईचा आहे. सरकारी व रेल्वे वर्कशॉप्समध्यें देशी मशीनटूल्स वापरण्याविषयीं भारत सरकार सूचना देत आहे व त्याप्रमाणें कंपनीकडे ऑर्डरी येऊं लागल्या आहेत.

### रिझर्व्ह बँकेंत संप होण्याचा संभव

रिझर्व्ह बँकेच्या पांच शाखांतील सुमारें ५,००० नोकरांचा, पगार वाढ मिळाली नाहीं तर संप करण्याचा विचार चालू आहे. इतर बँकांतील नोकरांच्या पगारापेक्षां रिझर्व्ह बँकेंतील नोकरांना जास्त पगार मिळावा अशी त्यांची मागणी आहे.

### वेस्टर्न इंडियाचें २५% डिव्हिडंड

वेस्टर्न इंडिया कंपनीच्या भागीदारांना १९४९ सालासाठीं २५% प्रमाणें स्पेशल डिव्हिडंड मिळणार आहे.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.